# खास शेतकऱ्यांसाठी मोबाईल ॲप विकसित

पुणे, ता. २२ : शेतीमधील फळे, भाज्या, डाळींची उपलब्धता, किंमत व सद्यःस्थितीविषयी अद्ययावत माहिती देणारे farmersorg.in हे मोबाईल ॲप माय विश्व टेक्नॉलॉजी या कंपनीने विकसित केले आहे. या ॲपमुळे शेतकऱ्यांचा वेळ व खर्चात बचत, मालाला योग्य दर मिळण्याबरोबर मानसिक त्रासही कमी होणार आहे.

माय विश्व टेक्नॉलॉजीतर्फे या ॲपचे पत्रकार परिषदेत अनावरण करण्यात आले. या वेळी अभिनेते नाना पाटेकर, माय विश्वचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार जोगळेकर, संचालिका सुप्रिया लिमये, गौरी बापट, युवा शेतकरी शेखर डिंबळे आदी उपस्थित होते.

जोगळेकर म्हणाले, ‘‘या ॲपमुळे शेतातून ग्राहकाच्या घरापर्यंत आणण्यासाठी लागणारा खर्च कमी होणार आहे. शेतकरी, ग्राहक, घाऊक व किरकोळ विक्रेत्यांना हा डिजिटल प्लॅटफॉर्म एकत्र आणणार आहे. ग्राहकांना विक्रीयोग्य वस्तूंची यादी या ॲपवर सातत्याने अद्ययावत होत राहणार आहे.’’ शेतकरी व विक्रेत्यांना सोपा अर्ज भरून तो या साइटवर अपलोड केल्यानंतर त्यांना सर्व माहिती उपलब्ध होणार आहे.